स्वयंअर्थ सहाय्यीत तत्वावर
वर्ग / तुकडी मंजूरी

जा.क्र.शिक्षण/आस्था/७अ/आरआर/ ५२६ /२०१५
शिक्षण विभाग (प्राथ).जि.प जळगाव
दिनांक – ९/९ /२०१५

प्रति,
मुख्याध्यापक
पोदार इटरनॅशनल स्कुल चाळीसगांव
ता. चाळीसगांव जिल्हा जळगांव

विषय :- कायम विना अनुदान तत्वावर मुळ वर्ग व अतीरीक्त तुकडया देणे बाबत
संदर्भ :- १. माहाराष्ट्र शासनाचे न हरकत (NOC) दिनांक ३१/०३/२०११
२. आपल्याकडील प्रस्ताव दिनांक ३०/०८/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भान्वये श्री पोदार इटरनॅशनल स्कुल चाळीसगांव ,ता चाळीसगांव जि. जळगांव माध्यम इंग्रजी या सी बी एस ई या अभ्यास क्रमास अंतर्गत खालील प्रामणे मुळ वर्ग व अतिरीक्त तुकडया मंजुर करण्यात येत आहे

| इयत्ता | नविन मंजूर केलेल्या तुकडया/वर्ग | शेरा |
|---|---|---|
| इयत्ता १ ली ते ७ वी | इयत्ता १ ली ते ७ वी | इयत्ता १ ते ७ वी च्या मुळ वर्गाव इंग्रजी माध्यमास तसेच इयत्ता २ री ची अतीरीक्त २ री तुकडी जुन २०१४ पासुन<br>इयत्ता ३ री अतीरीक्त २ री तुकडी जुन २०१५. |

वरील वर्ग/तुकडया पुढील अटी व शर्तीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. जादा तुकडयासाठी स्वतंत्र वर्ग खोल्यांची सोय आहे.
२. विद्यार्थी संख्या कमी झाल्यास तुकडया बंद करणे.
३. परिसरातील प्राथमिक शाळेवर सदर तुकडी उघडल्याने विपरीत परिणाम होणार नाही.
४. शाळांच्या आस्थापनेवर मागासवर्गीय अनुशेष पुर्ण करणे.
५. संस्थेने सदर वर्ग/तुकडया कायम विना अनुदान तत्वावर चालविणे बाबत हमीपत्र दिले आहे.
६. भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही.
७. भविष्यात माध्यम बदलणार नाही.

वरील तुकडया अनुक्रमे जून २०१५ पासून मान्य करण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, जळगांव.

प्रत माहितीसाठी :-
गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, चाळीसगांव यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

महाराष्ट्र शासन.
शिक्षण उपसंचालक,नाशिक विभाग नाशिक
(विभागीय आयुक्त कार्यालय परिसर नाशिक रोड नाशिक)

E-mail - dydensket@yahoo.com
Tel.No. ०२५३, २४५४९१०

Web siet-
Fax No. ०२५३, २४५४८१५

दिनांक:- २३ /०१ /२०१६.

जा.क्र.शिउसं/नावि/प्राथ-२/सी.बी.एस.ई-तु.प./२०१६/ 936/37

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, जळगाव

विषय: इयत्ता ८ वी च्या मूळ वर्गास मान्यता देणे बाबत.
पोदार इंटरनॅशनल स्कूल, चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव

संदर्भ: १. आपले पत्र क्र शिक्षण/आस्था/७अ/५७५/२०१५ दि.३०/१०/२०१५
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील ना-हरकत प्रमाणपत्र जाक्र. एन ओ सी-२०१०/(३२०/१०)/एस ई-१ दि.३१/३/२०११

उपरोक्त विषयास अनुसरुन शासनाने संदर्भ क्र २ अन्वये पोदार इंटरनॅशनल स्कूल, चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत सी बी एस ई अभ्यासक्रम सुरु करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. ही बाब विचारात घेऊन सदर शाळेस इयत्ता ८ वी च्या प्रथम वर्गास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यास हरकत नाही.

शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग, नाशिक

प्रत- माहितीकरीता
मुख्याध्यापक, पोदार इंटरनॅशनल स्कूल, चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव